# कशी करता येईल करबचत?

(मिलिंद संगोराम)

फेब्रुवारी आणि मार्च हे महिने नोकरदारांना खरोखरच 'टेन्शन' देणारे असतात. कारण याच महिन्यात पगारातून करकपात होत असते. वर्षभर करायची गुंतवणूक वेळेवर न केल्यामुळे हा फटका बसलेला असतो. ते दिवस विसरण्याच्या आतच पुढचा विचार करायला हवा. पुढच्या वर्षी एवढी कपात होऊ नये यासाठी या महिन्यापासूनच गुंतवणुकीला सुरवात करायला हवी.

## कलम ८०सी खालील वजावटी

८० सी हे करबचतीच्या गुंतवणुकीचे कलम आहे. कलम ८० सीमध्ये नमूद केलेल्या गुंतवणुकींत वर्षअखेरीपूर्वी केव्हाही रक्कम गुंतवली, तर ती रक्कम कमाल रु. १ लाखापर्यंत उत्पन्नातून वजा होते. 'पेड बेसिस'वर मिळणारी ही वजावट केवळ व्यक्ती आणि हिंदू अविभक्त कुटुंबांनाच लागू असून, पात्र गुंतवणूक करदात्याने स्वतःच्या करपात्र उत्पन्नातून गुंतवली पाहिजे, असे बंधन नाही. कलम ८० सी खाली पात्र गुंतवणुका व खर्च असे-

१) आयुर्विमा हप्ता, डिफर्ड ॲन्युइटी योजनेतील गुंतवणूक.
२) प्रॉव्हिडंड फंडात केलेली गुंतवणूक.
३) पब्लिक प्रॉव्हिडंट फंडात भरलेली रक्कम.
४) पोस्टाच्या क्युम्युलेटिव्ह टाइम डिपॉझिटमध्ये (सी.टी.डी.) भरलेली रक्कम.
५) नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटमध्ये (एन.एस.सी.) गुंतवलेली रक्कम.
६) युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅनमधील (यूलिप) गुंतवणूक.
७) म्युच्युअल फंडांच्या इक्विटी लिंक्ड सेव्हिंग स्कीममधील (ई.एल.एस.एस.) गुंतवणूक.
८) युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाच्या रिटायरमेंट बेनिफिट पेन्शन फंडातील गुंतवणूक.
९) नॅशनल हाऊसिंग बँकेच्या ठेव योजनेत भरलेली रक्कम.
१०) मुलांची भरलेली ट्यूशन फी.
११) गृहकर्ज मुद्दलाच्या परतपेडीची रक्कम.
१२) घर घेताना भरलेले मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क.
१३) बँक मुदत ठेव योजना, २००६ अंतर्गत ठेवलेली मुदत ठेव.
१४) मान्यताप्राप्त म्युच्युअल फंडातील गुंतवणूक.
१५) मान्यताप्राप्त शेअर्स आणि कर्जरोख्यांतील गुंतवणूक.
१६) पोस्ट ऑफिस टाइम डिपॉझिट स्कीम, १९८१ अंतर्गत १-४-२००७ पासून ५ वर्षे कालावधीसाठी केलेली गुंतवणूक.
१७) सिनिअर सिटिझन्स सेव्हिंग स्कीम २००४ अंतर्गत ता. ०१-०४-२००७ पासून केलेली गुंतवणूक.
१८) नाबार्ड रुरल बाँड्समध्ये ता. ०१-०४-२००७ पासून केलेली गुंतवणूक.

### उदाहरण क्र. १

श्री. हरिभाऊ हे ज्येष्ठ नागरिक असून, त्यांचे वार्षिक पेन्शन रु. १ लाख २० हजार, पोस्टाच्या मासिक प्राप्ती योजनेतून मिळणारे व्याज रु. ४८ हजार, बँक ठेवींवरील व्याज रु. ८० हजार इतके आहे. त्यांनी रु. पाच हजार रुपयांचा आयुर्विमा हप्ता भरला, तर त्यांचे २००८-०९ साठी करदायित्व असे राहील.

पगारापासूनचे उत्पन्न .......... रु. १,२०,०००
पेन्शन ........................ रु. १,२०,०००
अन्य स्त्रोतांपासूनचे उत्पन्न ..... रु. १,२८,०००
पोस्ट ऑफिस व्याज ............ रु. ४८,०००
बँक व्याज ...................... रु. ८०,०००
ढोबळ करपात्र उत्पन्न ......... रु. २,४८,०००
वजा :
कलम ८० सी खालील ............ रु. ५,०००
वजावट (आयुर्विमा)
निव्वळ करपात्र उत्पन्न ........ रु. २,४३,०००
करगणना : देयकर
(रु. २ लाख ४३ हजार वजा रु. २ लाख २५ हजार)
१० टक्के ......................... रु. १,८००
अधिक : शिक्षण उपकर (रु. १८०० च्या ३ टक्के) ५४
एकूण देय कर ...................... रु. १८५४

### उदाहरण क्र. २

सौ. मानसी या एका कंपनीत नोकरी करत असून, त्यांचा वार्षिक पगार रु. ४ लाख ४० हजार इतका आहे. या पगारापासून रु. २५०० व्यवसाय कर, रु. २४ हजार पी. एफ. व रु. ३६ हजार इतका प्राप्तिकर कापला गेला आहे. सौ. मानसी यांचे २००८-०९ साठी करदायित्व असे राहील.

पगारापासूनचे उत्पन्न ..........रु. ४,३७,५००
पगार ..........................रु. ४,४०,०००
वजा : व्यवसायकर ................ रु. २,५००
ढोबळ करपात्र उत्पन्न .......... . ४,३७,५००
वजा :
कलम ८० सी खाली वजावट (पी.एफ.) रु. २४०००
निव्वळ करपात्र उत्पन्न ........रु. ४,१३, ५००
करगणना :
देयकर ........................... रु. ३४,७००
रु. ० ते रु. १ लाख ८० हजार (० टक्के) रु. ०
रु. १,८०,००१ ते रु. ३ लाख (१० टक्के) रु. १२०००
रु. ३ लाख ते रु. ४,१३,५०० (२० टक्के) रु. २२७००
अधिक : शिक्षण उपकर (रु. ३४७०० च्या ३ टक्के) रु. १०४१
एकूण देयकर ..................... रु. ३५,७४१
वजा : पगारातून कापलेला कर ....रु. ३६,०००
रिफंड ..............................रु. २५९

### उदाहरण क्र. ३

श्री. राहुल यांचा तयार कपड्यांचा व्यवसाय असून, त्यांना २००८-०९ मध्ये रु. आठ लाख निव्वळ नफा झाला. श्री. राहुल यांचे व्याजाचे उत्पन्न रु. ४० हजार आहे. त्यांनी गृहकर्ज घेऊन एकमात्र राहते घर विकत घेतले असून, गृहकर्जावरील व्याज रु. १ लाख ८० हजार, तर मुद्दलाची परतफेड रु. ६० हजार आहे. श्री. राहुल यांचे २००८-०९ साठी करदायित्व असे राहील.

धंदा व्यवसायाचे उत्पन्न ........रु. ८,००,०००
घरापासूनचे उत्पन्न (-) ........रु. १,५०,०००
एकमात्र राहत्या घराचे वार्षिक मूल्य ......रु. ०
वजा : गृहकर्जावरील व्याज
(कमाल मर्यादेपर्यंत सीमित) ...रु. १,५०,०००
अन्य स्त्रोतांपासूनचे उत्पन्न ........ रु. ४०,०००
व्याज ............................ रु. ४०,०००
ढोबळ करपात्र उत्पन्न ..........रु. ६,९०,०००
वजा : कलम ८० सी खालील वजावट
(गृहकर्ज मुद्दलाची परतफेड) .....रु. ६०,०००
निव्वळ करपात्र उत्पन्न .........रु. ६,३०,०००
करगणना
देय कर .......................... रु. ९४,०००
रु. ० ते रु. १ लाख ५० हजार (० टक्के) रु. ०
रु. १,५०,००१ ते रु. ३ लाख (१० टक्के) रु. १५,०००
रु. ३,००,००१ ते रु. ५ लाख (२० टक्के) रु. ४०,०००
रु. ५,००,००१ ते रु. ६ लाख ३० हजार (३० टक्के) रु. ३९,०००
अधिक शिक्षण उपकर (रु. ९४ हजाराच्या ३ टक्के) रु. २८२०
एकूण देय कर .................... रु. ९६,८२०